महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेस्ना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेस्ना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
■ इलेक्ट्रिकल सुपरवायझर ■ ऑटोमोबाईल टेक्निशियन
■ इलेक्ट्रिकल वायरमन ■ मोटार वायडिंग
■ टू-व्हीलर मेकॅनिक ■ फोर व्हीलर मेकॅनिक
■ A.C. मेकॅनिक ■ वेल्डर / प्लंबर
■ कॉम्प्युटर ऑपरेटर ■ कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्अॅप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ९७ वा | शनिवार, दि.०८ नोव्हेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# ‘माझ्या हत्येच्या कटामागे धनंजय मुंडे’- जरांगे पाटील

## ‘धनंजय मुंडेंचा धंदाच तो’; नार्को टेस्ट आणि मोबाईल तपासणीची मागणी- करुणा शर्मा

अंतरवाली सराटी (कटूसत्य वृत्त):- मराठा आरक्षणासाठी मोठे आंदोलन उभे करणारे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचण्यात आल्याची बाब समोर आली आहे. जरांगे पाटील यांनी देखील या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

यानंतर पत्रकार परिषदेच्या माध्यमातून मनोज जरांगे पाटील यांनी त्यांच्या हत्येचा कट माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी रचल्याचा आरोप केला आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, ‘मुख्यमंत्र्यांनी धनंजय मुंडे यांची चौकशी करावी. कारण आरोपींसोबत त्यांच्या बैठका झाल्या आहेत. धनंजय मुंडे यांनी खून करण्याचा आणि घातपात करण्याचा कट रचला आहे. बीड आणि जालना जिल्ह्यातील सर्व प्रतिष्ठित नेत्यांनी ही गोष्ट त्यांच्या कानाने ऐकली आहे. त्यामुळे तुम्ही पक्षातील लोकांना विचारून घ्या की जरांगे पाटील सांगत होते ते खरे आहे का? मला ही गोष्ट कळाली.

### मुख्यमंत्र्यांनी धनंजय मुंडेची चौकशी करावी



त्यानंतर याबाबतची माहिती मी पोलीस प्रशासनाला दिली. कारण मुख्य सूत्रधारच धनंजय मुंडे आहेत. ज्यांच्या जीवाला धोका आहे, त्यांना सरकारने संरक्षण देणे गरजेचे आहे.’

धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप करताना जरागे-पाटील पुढे म्हणाले की, ‘मराठा समाजाने शांत रहावे. माझ्या गाडीचा अपघात करत मला ठार मारण्याचा प्रयत्न होता. बीडचा कांचन नावाचा माणूस आहे, तो धनंजय मुंडे यांचा कार्यकर्ता आहे. त्यांनीच माझ्या विरोधात हे षडयंत्र रचण्याचे काम केले आहे. मराठा समाजाच्या नेत्यांनी हा विषय गांभीयार्ने घेणे गरजेचे आहे. अशा वृत्तीचा आपल्याला नाय नाट करावा लागेल. आरक्षण, राजकारण हा विषय वेगळा आहे. पण जीवावर उठणे हा विषय खूप गंभीर आहे.’

गेल्या तीन वर्षांपासून मनोज जरांगे पाटील यांनी मराठी समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे यासाठी मोठे आंदोलन उभे केले आहे. या दरम्यान त्यांचे सरकार आणि ओबीसी नेत्यांशी मोठा संघर्ष झाल्याचे पाहायला मिळाले. जरांगे पाटील यांच्या मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याच्या मागणीला मंत्री छगन भुजबळ, मंत्री पंकजा मुंडे, माजी मंत्री धनंजय मुंडे आणि लक्ष्मण हाके यांनी जोरदार विरोध केला आहे.

याचदरम्यान जरांगे-पाटील आणि या ओबीसी नेत्यांमध्ये सातत्याने शाब्दीक चकमक होते. अशातच अलिकडे धनंजय मुंडे आणि मनोज जरांगे पाटील यांच्यात आरोप-प्रत्यारोप झाले होते. त्यानंतर आता जरांगे-पाटील यांच्या हत्येच्या कटाचे प्रकरण समोर आले आहे.

माझं आणि धनंजय मुंडेचं वैर नाहीये. त्याने जी घटना करायला नको होती, ती त्याने केली आहे. हा चेष्टेचा विषय नाही. त्याने परिस्थिती मर्यादेच्या पुढे नेली आहे.

#### धन्या, मी तुझ्यासारखा नाहीये, मी जातवाण - मनोज जरांगे

धनंजय मुंडे यांनी उत्तर दिल्यानंतर मनोज जरांगे यांनी पत्रकार परिषद घेत उत्तर दिले. "मला माहिती मिळाली होती. ती मी पोलिसांना दिली. घातपाताच्या प्रकरणात आठ ते दहा जण आहेत. त्यात धनंजय मुंडे पण आहे. त्या प्रकरणाची चौकशी व्हायला नको का?", असे जरांगे म्हणाले.

"धनंजय मुंडे नार्को टेस्ट करायची म्हणत असतील, तर मी नार्को टेस्ट करून घ्यायला तयार आहे. उद्या मी गृह मंत्रालयात, न्यायालयात, पोलीस अधीक्षक कार्यालयात, जिल्हाधिकारी कार्यालयात जाणार आणि नार्को टेस्ट करण्यासाठी अर्ज करणार. धन्या मी तुझ्यासारखा नाहीये. मी जातवाण आहे. मी असे खुनाचे, घातपाताचे आरोप करू शकत नाही. नार्को टेस्टला सगळ्यात आधी जाईल, तू काय सीबीआयची मागणी करतो?, अशी टीका जरांगेंनी धनंजय मुंडेंवर केली आहे.

राजकारण आणि आरक्षण एकत्र करण्याची गरज नाही", असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांना आव्हान दिले. मी नार्को टेस्ट करण्यासाठी अर्ज करणार, असेही प्रत्युत्तर जरांगेंनी मुंडेंना दिले आहे.

मनोज जरांगे यांनी धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप केला. धनंजय मुंडेंनी मला मारण्याची अडीच कोटी रुपयांमध्ये सुपारी दिली, असे जरांगे म्हणाले. त्यांनी कांचन नावाच्या व्यक्तीचाही उल्लेख केला. तो धनंजय मुंडेंचा पीए असल्याचेही जरांगे म्हणाले.

त्यानंतर धनंजय मुंडेंनी पत्रकार परिषद घेऊन जरांगेंचे आरोप फेटाळून लावले. थोतांड बंद करा म्हणत त्यांनी मनोज जरांगे आणि माझी ब्रेन मॅपिंग, नार्को टेस्ट करा आणि हे प्रकरण सीबीआयकडे तपासासाठी द्या, अशी मागणी केली.

#### जरांगे पाटलांनी पत्रकार परिषदेत ऐकवली ऑडिओ क्लिप

"दुसऱ्या मुंडे गटाचे लोक वापरायचे आणि ते तुझेच आहेत, असे म्हणायचे. धन्या तू आता पक्का अडकला आहे", असे जरांगे म्हणाले. ऑडिओ क्लिप ऐकवत जरांगेंनी सांगितले की, "या क्लिपमधील २ आरोपी आहेत. तुम्ही पैशांसाठी मूळावर उठतात का? समाज इतका कमजोर झाला असे तुम्हाला दाखवायचे आहे का? मी समाजासाठी रक्त सांडायला तयार आहे", अशी टीका जरांगे पाटलांनी केली.

या प्रकरणावर करुणा शर्मा यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. त्या म्हणाल्या की, जरांगे भाऊंनी जे सांगितले की त्यांच्याविरुद्ध कट रचला गेला आहे, ते खरे आहे. धनंजय मुंडे यांचा धंदाच तो आहे. जे त्यांच्या विरोधात जातात, त्यांच्या विरोधात ते कटकारस्थान रचतात. जरांगे पाटील यांच्या लोकांना फोडण्यात आले आणि मला याची माहिती एक महिना आधीच होती. दादा गरड माझ्या घरी तीन वेळा आला होता. पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांचा मोबाईल तपासावा, कारण त्यात धनंजय मुंडे आणि त्यांची रेकॉर्डिंग आहे, असे त्यांनी सांगितले.

करुणा शर्मा पुढे म्हणाल्या की, माझी देखील नार्को टेस्ट व्हायला पाहिजे. पाच लाख रुपये आणि गाडीची बाब या प्रकरणात आहे. दोन नोव्हेंबर रोजी तो माझ्याकडे आला आणि मला पैसे मागितले. मी न्याय मागण्यासाठी जरांगे यांच्याकडे गेले होते. कराड याने मला बेदम मारहाण केली होती, त्याचे CCTV फुटेज आहे. त्याने आपल्या पत्नीला मारले आहे, तो आणखी काय करू शकत नाही? मी मुंडे घराण्याची सून आहे. त्यांनी माझ्यासोबत जे केले त्यामुळे माझी आणि त्यांच्या दोघांचीही नार्को टेस्ट व्हायला हवी. माझ्याकडे पुरावे आहेत आणि वेळ आल्यावर ते दाखवेन. माझ्या मागे कोणी नाही, पण मला न्याय पाहिजे. दादा गरड याची रेकॉर्डिंग मी स्वतः ऐकली आहे. त्याने मला पाच वेळा फोन केला आणि घरी आला होता, असेही करुणा शर्मा म्हणाल्या.

# शिवसेना शिंदे गटाचा धनुष्यबाण घेऊन सरताज शेख (सय्यद) यांची प्रभाग नऊ मध्ये होणार एन्ट्री

## आमदार राजू खरे यांचे निकटवर्तीय समर्थक सर्फराज सय्यद यांच्या जनसंपर्काचा मोठा फायदा होणार

**मोहोळ (साहिल शेख):-** राष्ट्रवादी आणि शिवसेना असाच यापूर्वी संयुक्त बालेकिल्ला असलेल्या प्रभाग नऊ मध्ये शिवसेना शिंदे गट दमदार एन्ट्री करण्याच्या तयारीत आहे मोहोळ नगर परिषदेच्या निवडणुकीत विद्यमान आमदार राजू खरे यांच्या नेतृत्वाखाली या प्रभागातून सरताज सलीम शेख (सय्यद) हे ओबीसी प्रवगार्तून निवडणूक लढवणार असल्याचे आता निश्चित झाले आहे. सरताज सय्यद हे धनुष्यबाण चिन्हावर या निवडणुकीत अन्य उमेदवारांना आव्हान देणार आहेत. सरताज शेख ह्या उच्चशिक्षित असून या शिक्षणाचा प्रभागातील समस्या सोडविण्यासाठी फायदा होईल. मोहोळ शहरातील सामाजिक क्षेत्रात आणि राजकीय क्षेत्रात अल्पावधीतच नावलौकिक प्राप्त केलेले सर्फराज तथा लड्डू सय्यद यांच्या सुविद्य पत्नी आहेत सय्यद परिवार हा गेल्या दीड दशकापासून मोहोळ शहराच्या सामाजिक राजकीय आणि सांस्कृतिक उपक्रमामध्ये सातत्याने सहभागी होऊन जनसामान्यांची सेवा करत आला आहे.



आमदार राजू खरे हे या मतदारसंघात गेल्या अनेक वर्षापासून संपर्क ठेवून होते. गेल्या पाच वर्षापासून सर्फराज सय्यद हे आमदार राजू खरे यांच्या संपकार्तील विश्वासू समर्थक आणि मनमिळाऊ कार्यकर्ते म्हणून परिचित आहेत. अत्यंत आव्हानात्मक काळात आमदार राजू खरे यांच्या सोबत असलेले सर्फराज सय्यद यांच्या उमेदवारीच्या रूपाने त्यांना नक्कीच या निष्ठेची पोचपावती मिळेल असा विश्वास या प्रभागातील त्यांच्या कार्यकर्त्यांना आहे. या प्रभागातील स्थानिक रहिवासी असण्याबरोबर त्यांचा या प्रभागात स्नेह परिवार आणि मित्रपरिवार मोठा आहे. त्यांचाही मोठा पाठिंबा यांना मिळाल्यास ते या प्रभागाचे कार्यकुशल आणि दक्ष नगरसेवक म्हणून जोरदार एन्ट्री करतील यातील मात्र शंका नाही.

सर्फराज सय्यद हे आमदार राजू खरे यांचे निकटवर्तीय समर्थक असून त्यांच्याच नेतृत्वाखाली हे या प्रभागातून निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आरक्षण सोडतीच्या पहिल्या दिवसापासूनच त्यांनी प्रभागातील जनसंपर्क मोठ्या प्रमाणात वाढवला आहे. शिवाय हे याच प्रभागातील स्थानिक रहिवासी असल्यामुळे स्थानिक उमेदवारीच्या महत्त्वपूर्ण मुद्द्यावर ते या प्रभागातील निवडणुकीचे रान चांगलेच तापवत आहेत. त्यामुळे सरफराज सय्यद यांची उमेदवारी या प्रभागात शिवसेना शिंदे गटाच्या दृष्टीने अत्यंत जमेची बाब ठरत असून त्यांना निश्चितपणे निवडणुकीत मोठा प्रतिसाद मिळेल अशी सरफराज सय्यद यांच्या समर्थकांना अपेक्षा आहे.

# व्हीव्हीपॅटचा वापर करायचा नसेल तर बॅलेट पेपरवर निवडणुका घ्या

## उच्च न्यायालयाचे निवडणूक आयोगाला निर्देश

**नागपूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका मतदार पडताळणी पावती प्रणाली (व्हीव्हीपॅट) शिवाय घेण्याच्या राज्य निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव प्रफुल्ल गुडघे यांच्या याचिकेवर नागपूर खंडपीठाने शुक्रवारी राज्य निवडणूक आयोगाला नोटीस बजावली.

न्यायालयाने आयोगाला चार दिवसांच्या आत या संदर्भात आपले म्हणणे स्पष्ट करण्याचे निर्देश दिले आहेत. ही याचिका न्यायमूर्तींच्या खंडपीठासमोर शुक्रवारी सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांच्या वतीने अॅड. पवन दहाट आणि अॅड. निहालसिंग राठोड यांनी जोरदार युक्तिवाद करताना म्हटले की, सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच विविध प्रकरणांमध्ये व्हीव्हीपॅट प्रणालीची गरज अधोरेखित केली आहे.मतदानाच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणि मतदारांचा विश्वास टिकवण्यासाठी ही प्रणाली आवश्यक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले आहे.




**मतदानातील पारदर्शकतेचा मुद्दा**

याचिकेमध्ये म्हटले आहे की, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे म्हणजेच इव्हीएम वापरताना मतदाराला आपले मत नोंदले गेले आहे की नाही याची खात्री मिळत नाही. व्हीव्हीपॅट प्रणालीमुळे प्रत्येक मतदाराला काही क्षणांसाठी त्याने कोणाला मत दिले याची पावती स्वरूपात झलक दिसते, ज्यामुळे मतदान प्रक्रियेवर विश्वास दृढ होतो. "मतदार पडताळणी ही केवळ तांत्रिक सुविधा नसून ती लोकशाहीतील पारदर्शकतेचा पाया आहे," असे याचिकाकर्त्यांनी नमूद केले आहे.

त्यांनी पुढे म्हटले आहे की, जर राज्य निवडणूक आयोगाने कोणत्याही कारणास्तव मशीन उपलब्ध करून देऊ शकत नसल्यास, निवडणुका पारंपरिक मतपत्रिकांच्या माध्यमातून घेण्यात याव्यात. "लोकशाहीत विश्वास हा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. तो तांत्रिक सुलभतेच्या नावाखाली दुर्लक्षित करता येणार नाही," असेही याचिकेत नमूद आहे.

**कायदेशीर पार्श्वभूमी काय?**

सर्वोच्च न्यायालयाने २०१९ मध्ये दिलेल्या निर्णयात प्रत्येक मतदारसंघातील काही मतदान केंद्रांवर वव्हीव्हीपॅट पडताळणी अनिवार्य केली होती. त्या निर्णयाचा दाखला देत गुढे यांनी म्हटले आहे की, राज्य निवडणूक आयोगाला हीच भूमिका स्थानिक स्वराज्य निवडणुकांसाठी देखील लागू करणे आवश्यक आहे. अन्यथा मतमोजणीच्या निष्कर्षावर शंका निर्माण होऊन संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उभे राहू शकते. या याचिकेनंतर काँग्रेसकडून राज्यभर या विषयावर जनजागृती मोहीम राबविण्याची तयारी सुरू आहे. "मतदार पडताळणीशिवाय निवडणूक म्हणजे डोळ्यावर पट्टी बांधून लोकशाही चालवण्यासारखे आहे," असे गुढे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

दरम्यान, निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांकडून याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नाही. मात्र, उच्च न्यायालयाने नोटीस बजावल्यामुळे स्थानिक निवडणुका होण्यापूर्वी या महत्त्वाच्या प्रश्नावर कायदेशीर स्पष्टता येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. कायदेशीर तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, जर न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या मुद्द्याला मान्यता दिली, तर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या वेळापत्रकावरही परिणाम होऊ शकतो. कारण, व्हीव्हीपॅट मशीनच्या वापरासाठी आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय तयारी करण्यास वेळ लागणार आहे.

निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा अॅण्ड फिजिओथेरपी सेंटर
ISO 9001:2015
NGO
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार



नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ताः गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

# जनतेचे प्रेम कधीही विसरणार नाही- आ. सचिन कल्याणशेट्टी

**अक्कलकोट, (कटूसत्य वृत्त):-** वाढदिवसानिमित्त मिळालेल्या शुभेच्छा आणि आशीर्वाद कधीही विसरणार नाही. या स्नेहबळावर आणखी जोमाने कार्य करणार असून या सत्काराने आणि आशीवार्दाने आपण भारावलो आहे, असे भावनिक उद्गार आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी काढले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू आणि विकासाभिमुख नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे आमदार कल्याणशेट्टी यांचा वाढदिवस अक्कलकोटमध्ये मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. हन्नूर रोडवरील कल्याणशेट्टी महाविद्यालयाच्या विशाल प्रांगणात आयोजित अभीष्टचिंतन सोहळ्यास शहर, तालुका आणि जिल्ह्यातील असंख्य भाजप नेते, पदाधिकारी आणि नागरिकांनी उपस्थित राहून या उत्सवाला भव्यता प्राप्त करून दिली.



म.नि.प्र. बसवलिंग महास्वामी, आमदार देवेंद्र कोठे, शहाजी पवार, मोहोळचे युवा नेते अजिंक्यराणा पाटील, वळसंग सूतगिरणीचे राजशेखर शिवदारे, सोलापूर बाजार समितीचे सभापती दिलीप माने, उपसभापती सुनील कळके, संचालक सुरेश हसापुरे, केदार उंबरजे, सुरेश पाटील, श्रीशैल बनशेट्टी, गुरुशांत धुत्तरगावकर, बीज्जू प्रधाने, प्रा. अशोक निंबर्गी, दिलीप सिध्दे, सुशील क्षीरसागर, श्रीशैल नरोळे, सुभाष पाटोळे, उदय पाटील, वैभव बरबडे, अप्पू बिराजदार आदी मान्यवरांनी शुभेच्छा देऊन आमदार कल्याणशेट्टी यांचा गौरव केला.

अन्नछत्र मंडळाचे अमोलराजे भोसले, वटवृक्ष देवस्थानचे महेश इंगळे, भाजप मंडल अध्यक्ष प्रदीप पाटील, इंद्रजित पवार, रामचंद्र होनराव, नन्नूभाई कोरबू, आनंद तानवडे, महेश हिंडोळे, दयानंद बिडवे, प्रभाकर मजगे, शिवशरण जोजन, जलील बागवान, रामचंद्र अरवत, सुरेश गड्डी, सुरेश नागूर, शिवयोगी स्वामी, अतूल मेळकुंदे, उमेश पाटील, अविनाश मडिखांबे, महेश पाटील, प्रशांत लोकापुरे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष मल्लिनाथ साखरे, अमर पाटील, सुधा अळ्ळीमोरे, विपूल दोशी, नाविद डांगे, मुबारक शेख, शिवकुमार कापसे, नागराज कुंभार, कांतू धनशेट्टी, सातलिंग परमशेट्टी, अतूल कोकाटे, विक्रम शिंदे, मल्लिकार्जुन आळगी, विलास कोरे, गजानन पाटील, राजशेखर हिप्परगी, अरविंद ममनाबाद, रामचंद्र बिराजदार, बसवराज हौदे, दयानंद बिडवे, दत्ताकुमार साखरे, महादेव कोगनुरे, सागर तेली, डॉ. शरणू काळे, डॉ. गणेश थिटे, सिध्दाराम टाके, अभी लोकापुरे, परमेश्वर यादवाड, महादेव माने, सुरेश झळकी यांनी भेटून शुभेच्छा दिल्या.

शिवाय भ्रमणध्वनीवरून श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचे ज्येष्ठ संचालक धर्मराज काडादी यांच्यासह राज्यातील अनेक विधानसभेतील सहकारी, धर्मगुरूंनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात मल्लिकार्जुन मंदिर पंच कमिटी, कोष्टी समाज, व्यापारी महासंघ, छत्रपती श्री संभाजी महाराज सोहळा समिती, शिव बसव प्रतिष्ठान, सोन्या मारुती प्रतिष्ठान, साई समर्थ प्रतिष्ठान, श्री शक्तिदेवी नवरात्र महोत्सव मंडळ, नागनाथ नवरात्र महोत्सव, राजे प्रतिष्ठान, पत्रकार संघटना, रिध्दी सिध्दी गणेश मंदिर समिती, भारत गल्ली नवरात्र महोत्सव यांसारख्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक संस्थांचा सहभाग विशेषत्वाने उठून दिसत होता. या सर्व मंडळांनी शुभेच्छा देत त्यांचा सन्मान केला.

अनेक मान्यवरांनी आमदार कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोट तालुका विकासाच्या दिशेने सातत्याने वाटचाल करत असल्याचे गौरवोद्गार काढले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकायार्ने महायुती सरकारच्या माध्यमातून अक्कलकोटमधील विविध प्रकल्पांना गती मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमात आलेल्या सर्व मान्यवरांचे व कार्यकत्यांचे स्वागत ज्येष्ठ नेते सिध्देश्वर कल्याणशेट्टी, मल्लिनाथ कल्याणशेट्टी, मीलन कल्याणशेट्टी, सागर कल्याणशेट्टी व परिवाराच्यावतीने करण्यात आले. प्रारंभी सकाळी हुमनाबाद येथे कुलदैवत वीरभद्रेश्वर देवस्थानाचे दर्शन घेऊन वाढदिवसाचा प्रारंभ करण्यात आला होता. दिवसभर भारतीय जनता पक्ष कार्यालय तसेच कल्याणशेट्टी महाविद्यालयात शुभेच्छुकांची गर्दी ओसंडून वाहत होती.

विकणे /भाड्याने देणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५
८२७५२७४२५३
पत्ताः अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

## संपादकीय

# शिक्षणावर 'काळे ढग?'

आजकाल विद्यार्थी शाळेत, महाविद्यालयात केवळ औपचारिकता म्हणून प्रवेश घेतात आणि शिक्षणासाठी मात्र खासगी शिकवणुकीला जातात. पालकांचीही हीच धारणा झालेली आहे. त्यामुळे शिक्षणावर गडद काळे ढग निर्माण होत आहेत.

आज शिक्षण हा एक व्यवसाय बनला आहे आणि त्याचा सर्वात ठळक चेहरा म्हणजे खासगी शिकवण्यांचा वाढता बाजार. एकेकाळी शिक्षण हे समाजसेवेचे, ज्ञानदानाचे व्रत मानले जात असे; परंतु आज या क्षेत्रात आर्थिक व्यवहारांचा आणि स्पर्धेचा प्रभाव अधिक दिसू लागला आहे. पालकांच्या महत्त्वाकांक्षा, विद्यार्थ्यांवरील स्पर्धेचा ताण आणि शालेय शिक्षणावरील घटता विश्वास या सर्व गोष्टींनी मिळून खासगी शिकवण्यांचे जाळे झपाट्याने पसरले आहे. या शिकवण्या आता केवळ पूरक शिक्षणाचे साधन राहिलेल्या नाहीत, तर त्या स्वतंत्र उद्योगसाखळी बनल्या आहेत.

पूर्वी विद्यार्थी शाळेतील शिक्षकांनी दिलेले धडे आत्मसात करूनच उत्तम गुण मिळवत असत. मात्र आज शाळेत जाऊनही विद्यार्थी खासगी क्लासशिवाय अभ्यास पूर्ण होऊ शकत नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. शिक्षकांच्या मनावर परीक्षा निकालांचा दबाव आहे, तर पालकांच्या मनात स्पर्धात्मक परीक्षांचे भय. परिणामी शाळा ही फक्त उपस्थिती नोंदविण्याचे केंद्र राहिली असून, खऱ्या अर्थाने शिक्षणाचा पाया 'क्लासेस'मध्ये घडू लागला आहे!

खासगी शिकवण्यांचा हा उद्योग इतका फोफावला आहे की त्याला आता 'एज्युकेशन इंडस्ट्री' असेच म्हणावे लागेल. अनेक ठिकाणी मोठमोठ्या कोचिंग संस्थांनी भव्य इमारती उभारल्या आहेत. तेथील शुल्क हे गरीब पालकांच्या आवाक्याबाहेर आहे. शहरातील प्रत्येक गल्लीबोळात 'टॉपर क्लासेस', 'रँक इन्स्टिट्यूट', 'अमुक अमुक अकॅडमी' अशी नावं आपल्याला दिसतात. त्यांचा उद्देश विद्यार्थ्यांना घडवणे कमी आणि मार्केटमध्ये आपली ओळख निर्माण करणे अधिक आहे. शिक्षण क्षेत्रातील स्पर्धेने शिक्षक आणि विद्यार्थी दोघांनाही थकवून टाकले आहे.

या शिकवण्या विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या नावाखाली एका धावपळीच्या चक्रात ओढतात. सकाळपासून संध्याकाळपर्यंत शाळा, त्यानंतर कोचिंग क्लासेस आणि मग गृहपाठ अशी विद्यार्थ्यांची दिनचर्या बनली आहे. खेळ, वाचन, चिंतन, सर्जनशीलता या सगळ्याचा बळी या शैक्षणिक शर्यतीत जात आहे. पालकांची मानसिकता अशी झाली आहे की, क्लासेसमध्ये घातलं म्हणजे जबाबदारी संपली. त्यामुळे मुलांच्या सर्वांगीण विकासाऐवजी फक्त गुणांवर लक्ष केंद्रित झाले आहे. या परिस्थितीत शाळेतील शिक्षकांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. काही वेळा शिक्षक स्वतः क्लासेस घेत असल्याने विद्यार्थ्यांचा विश्वास द्विधा झाला आहे. शाळेत शिकवताना शिक्षकांना विद्यार्थ्यांचे लक्ष मिळत नाही, कारण तेच विद्यार्थी त्यांच्याकडूनच सायंकाळी क्लासेसमध्ये अधिक पैसे देऊन शिकतात. परिणामी शालेय शिक्षणाची गुणवत्ता आणि शिक्षकांविषयी आदर या दोन्ही गोष्टी ढासळत चालल्या आहेत. शिक्षणसंस्थांनीही अनेकदा या प्रवाहास आळा घालण्याऐवजी त्यास अप्रत्यक्ष मान्यता दिली आहे.

खासगी शिकवण्या या आज शिक्षणाचा पर्याय नाहीत, तर शिक्षणावरचं संकट बनल्या आहेत. समाजातील आर्थिक विषमता वाढवत आहेत. श्रीमंत पालकांना दर्जेदार कोचिंग मिळते, तर गरीब पालकांचा मुलगा त्या स्पर्धेत मागे राहतो. त्यामुळे शिक्षणातील समता, समान संधी आणि सार्वजनिक शिक्षणव्यवस्थेचा पाया हादरतो आहे. हळूहळू ही परिस्थिती समाजातील शैक्षणिक अन्याय निर्माण करत आहे. या विकृतीवर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने काही ठोस उपाययोजना तातडीने राबविणे गरजेचे आहे. सर्वप्रथम, शालेय शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण, शैक्षणिक साधने आणि मूल्यमापन पद्धतीमध्ये क्रांतिकारी बदल घडवणे आवश्यक आहे. शाळांमध्ये प्रत्यक्ष अध्यापनाचे आकर्षक आणि प्रयोगशील वातावरण निर्माण केले पाहिजे, ज्यामुळे विद्यार्थी शाळेतच आनंदाने शिकतील व बाह्य शिकवणीची गरज भासणार नाही.

शासनाने खासगी शिकवण्यांचे नियमन करण्यासाठी एक स्वतंत्र कायदा व नियंत्रण संस्था निर्माण करावी, ज्यामार्फत अशा संस्थांच्या शुल्क, वेळापत्रक आणि गुणवत्तेवर देखरेख ठेवली जाईल. प्रत्येक विद्यार्थी वर्गाच्या बाहेर शिकवणी घेण्यास भाग पाडला जाणार नाही, याची खबरदारी घेतली पाहिजे. शैक्षणिक व्यवस्थेत पारदर्शकता आणून, शाळा–क्लासेस यांच्यातील संबंध तोडले पाहिजेत. शिक्षकांना क्लासेसच्या आश्रयापासून मुक्त केले पाहिजे. शिक्षकांना 'अध्यापनाची आवड' हीच त्यांची खरी संपत्ती वाटली पाहिजे, 'अतिरिक्त कमाईचा मार्ग' नव्हे.

पालकांनीसुद्धा आपली मानसिकता बदलली पाहिजे. मुलावर केवळ गुणांच्या अपेक्षेचा ताण देण्याऐवजी त्याच्या व्यक्तिमत्त्व विकासाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. अभ्यास म्हणजे स्पर्धा नाही, तर आत्मविकासाचा प्रवास आहे, हे समजून घेणे गरजेचे आहे. एकंदर पाहता, खासगी शिकवण्यांचा वाढता बाजार ही केवळ शिक्षणातील समस्या नसून, ती संपूर्ण समाजाच्या मूल्यसंस्थेचे प्रतिबिंब आहे. शिक्षण हे व्याप नसून संस्कार घडविण्याचे माध्यम आहे, हे आपण विसरलो आहोत. आज पुन्हा एकदा शिक्षण क्षेत्रात मूल्य, संस्कार आणि सार्वजनिक जबाबदारी या तिन्ही गोष्टींचे पुनरुज्जीवन करणे ही काळाची गरज आहे.

ज्याप्रमाणे 'ज्ञान विकता' येत नाही, तसेच 'शिक्षण खरेदी' करता येत नाही. ज्ञानाचा खरा प्रकाश फक्त त्या शिक्षकाकडून पसरतो, जो विद्यार्थ्याला शिकवण्यात नव्हे तर घडवण्यात आनंद मानतो. म्हणूनच आजच्या परिस्थितीत सर्वांनी मिळून विचार करणे आवश्यक आहे, आपण शिक्षण देत आहोत की फक्त गुणांची विक्री करीत आहोत?

# शहरीकरण : विकासाचे क्षितिज की सामाजिक संतुलनाचे आव्हान

दरवर्षी ८ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण जगात 'जागतिक शहरीकरण दिन' म्हणून पाळला जातो. आधुनिक मानवसभ्यतेपुढील सर्वात वेगाने घडणाऱ्या सामाजिक प्रक्रियांपैकी शहरीकरण ही एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. शहरांचा विस्तार, लोकसंख्येचे स्थलांतर, जीवनशैलीतील बदल, पर्यावरण–विकासातील संघर्ष, अर्थव्यवस्थेतील नवीन संरचना आणि सांस्कृतिक मूल्यव्यवस्थेचा पुनर्विचार यांद्वारे शहरीकरण मानवी समाजाचे भविष्य ठरवत आहे. आज जगातील ४० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या शहरी भागात राहते आणि पुढील काही दशकांत ही संख्या ७० टक्क्यांपर्यंत पोहोचेल, असे तज्ज्ञ मानतात. अशा परिस्थितीत शहरीकरणाचा अभ्यास केवळ भौगोलिक किंवा आर्थिक विषय नसून मानवी जीवनाच्या समग्र परिवर्तनाची प्रक्रिया म्हणून पाहण्याची गरज आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून शहरीकरण समजून घेताना आपल्याला व्यक्ती, कुटुंब, समुदाय, संस्था, पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि सांस्कृतिक संरचना, सामाजिक समस्या या सर्व स्तरांकडे एकत्र पाहावे लागते. कारण शहरीकरण हे केवळ माणूस कुठे राहतो याचा प्रश्न नसून माणूस कसा राहतो, कसा विचार करतो, आणि कशातून आपली सामाजिक ओळख घडवतो याचा प्रश्न आहे.

शहरीकरणाची प्रक्रिया पाहताना सर्वप्रथम लक्षात येते ते म्हणजे ग्रामीण लोकसंख्येचे शहरांकडे झपाट्याने होणारे स्थलांतर. ग्रामीण भागातील रोजगाराच्या मर्यादित संधी, शेतीवरील अवलंबन, शेती उत्पन्नातील अस्थिरता, शिक्षण आणि आरोग्य सुविधा अपुऱ्या असणे, तसेच आधुनिक जीवनशैलीकडे आकर्षण या कारणांमुळे लोक शहरांमध्ये संधींच्या शोधात येतात. शहर व्यक्तीला नवीन ओळख, आर्थिक स्थैर्य, कौशल्यविकास आणि प्रगतीची संधी उपलब्ध करून देते. विशेषतः युवकांसाठी शहर 'स्वप्नपूर्तीचे केंद्र' ठरते. शिक्षण संस्था, उद्योग, आय टी कंपन्या, व्यावसायिक क्षेत्रे, सर्जनशील उपक्रम आणि उद्यमशीलतेच्या संधी यामुळे शहर आधुनिक उन्नतीचा प्रतीक बनते. स्त्रियांसाठी विशेषतः शहराने शिक्षण, रोजगार आणि स्वावलंबनाच्या दृष्टीने नवे दरवाजे उघडले आहेत. त्यामुळे शहरीकरणाने स्त्री–पुरुष समानतेच्या चळवळीला नवीन गती दिली आहे.

परंतु शहरीकरणाचे वास्तव इतके सरळसोपे नाही. संधींसोबतच शहरात आव्हानांचे प्रचंड जाळेही आहे. शहर म्हणजे चमकणारे दिवे, उंच इमारती, व्यस्त रस्ते आणि गतिमान वाहतूक होय. परंतु या चमकाखाली संघर्ष, असमानता, तणाव आणि अस्थैर्याचे वास्तव दडलेले असते. ग्रामीण भागातून शहरात आलेल्या बहुसंख्य लोकांना परवडणारी घरे मिळत नाहीत. शहरातील जमीन महाग आणि मर्यादित असल्याने झोपडपट्ट्या विकसित होतात. झोपडपट्टीकरण हे शहरीकरणाचे मोठे सामाजिक आव्हान आहे. अरुंद घरं, गर्दी, अस्वच्छता, सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा अभाव, आरोग्यसेवा अपुरी, वाहतूक आणि शिक्षणाच्या मर्यादित सुविधा यामुळे शहराचा विकास एकतर्फी आणि विषम वाटू लागतो. एका बाजूस गगनचुंबी इमारती आणि आलिशान सोसायट्या, तर दुसऱ्या बाजूस झोपड्या ही दृश्यगती शहरीकरणातील सामाजिक विषमतेचे प्रतीक बनते.

समाजशास्त्राच्या भाषेत शहर हा 'व्यक्तिनिष्ठ समाज' (Individualistic Society) मानला जातो. ग्रामीण समाजात नाती, परस्परसहकार्य, शेजारधर्म आणि वृत्तीतील एकोप्याला महत्त्व असते. परंतु शहरात व्यक्तीची जीवनशैली अधिक स्पर्धात्मक, वेगवान आणि एकाकी होते. कामाचा ताण, वेळेचे बंधन, करिअरची धडपड, आर्थिक खर्चाचा दबाव यामुळे सामाजिक नात्यांची उब कमी होते. कुटुंबव्यवस्थेच्या दृष्टीनेही शहरीकरणाचे परिणाम खोलवर आहेत. संयुक्त कुटुंबे कमी होत गेली आणि विभक्त कुटुंब प्रबळ झाले. पालक आणि मुलांमधील संवादाचे स्वरुप बदलले. ज्येष्ठ आणि बालक सांभाळण्याची जबाबदारी वाढली. वृद्धांची सामाजिक स्थानिक ओळख कमी झाली. तरुण पिढी आधुनिक विचारसरणी अंगीकारताना परंपरा आणि सांस्कृतिक मूल्यसाखळी यांच्यात अंतर वाढू लागले.

सांस्कृतिक स्तरावर शहर जागतिक संस्कृतीचे प्रवेशद्वार बनले आहे. फॅशन, ग्लोबल मीडिया, मनोरंजन क्षेत्र, डिजिटल संस्कृती, उपभोक्तावाद आणि ब्रँड ओळखीमुळे व्यक्तीचे आत्ममूल्य 'उपभोग क्षमते'वर आधारित होत चालले आहे. समाजात प्रतिष्ठा, सन्मान आणि ओळख यांचे अर्थ बदलत आहेत. आजचा माणूस 'असण्यात' कमी आणि 'दिसण्यात' अधिक गुंतला आहे. त्यामुळे जीवनातील समाधानाचा स्रोत वस्तूंमध्ये, अनुभवांमध्ये आणि बाह्यकेंद्रित यशात शोधला जात आहे. त्यामुळे मानसिक आरोग्यावरही शहरीकरणाचे गंभीर परिणाम दिसून येतात. तणाव, नैराश्य, एकटेपणा, स्पर्धा, असुरक्षितता आणि भावनिक अस्थिरता हे शहरी जीवनाचे छुपे साथीदार झाले आहेत.

शहरीकरणाचे आणखी एक मोठे आव्हान म्हणजे पर्यावरणीय असंतुलन होय. शहरांचा विस्तार म्हणजे नैसर्गिक संसाधनांवर प्रचंड ताण होय. जंगलांची तोड, नदी आणि नाले बुजवणे, वाहनांची वाढ, रासायनिक उत्सर्जन, प्लास्टिक कचरा, पाणी, ध्वनी आणि हवा प्रदूषण यामुळे शहरांचे पर्यावरण अस्वस्थ झाले आहे. पावसाळ्यात शहरी पूर, उन्हाळ्यात पाण्याची टंचाई, हवेच्या गुणवत्तेत घट, उष्ण बेट प्रभावामुळे तापमान वाढ आणि ऋतुचक्रात विसंगती असे परिणाम सर्वत्र दिसतात. अशी परिस्थिती मानवाच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यास गंभीर धोका निर्माण करते.

तरीही, शहरीकरणाचे सकारात्मक पैलूही तितकेच ठळक आहेत. शहर ही प्रगतीची प्रयोगशाळा आहे. येथे विविध भाषा, संस्कृती, धर्म, परंपरा, विचारधारा आणि जीवनशैली एकत्र येतात. त्यामुळे शहरात विविधतेतून नवी सामाजिक रचना निर्माण होते. शिक्षण संस्थांमुळे वैज्ञानिक दृष्टी वाढते, संशोधन व नवकल्पना घडतात, कला–साहित्य–नाट्य–संगीत–विचार यांची देवाणघेवाण होते. मानवाधिकार, स्त्री–पुरुष समानता, सामाजिक न्याय, पर्यावरण संरक्षण, युवा सहभाग अशा आधुनिक चळवळी शहरांतूनच गतिमान झाल्या आहेत. शहर कल्पनांना उलगडते, व्यक्तिमत्त्व घडवते आणि स्वप्ने जगण्याची संधी देते.

म्हणूनच, प्रश्न शहरीकरणाचा विरोध करण्याचा नाही; तर त्याला योग्य दिशादर्शन देण्याचा आहे. शहरी विकास सर्वसमावेशक, पर्यावरणपूरक, मानवी मूल्यांवर आधारित आणि सामाजिक न्याय साधणारा असायला हवा. शहरांची रचना 'माणूस–केंद्रित' असावी; केवळ पायाभूत सुविधांवर आधारित नाही. सार्वजनिक वाहतूक, परवडणारी घरे, स्वच्छता, आरोग्य सुविधा, हरित क्षेत्र, पादचारी व सायकल मार्ग, सांस्कृतिक खुली मैफिली, सामुदायिक संवादाची जागा ही सर्व शहराच्या आरोग्यासाठी तितकीच आवश्यक आहेत जितकी उद्योग आणि तंत्रज्ञान आवश्यक आहे.

जागतिक शहरीकरण दिनाचे महत्त्व हेच की आपण शहरांच्या वाढीला फक्त वेग द्यायचा नाही, तर दिशा द्यायची आहे. शहर विकसित व्हावं, पण त्याचसोबत नाती, भावना, पर्यावरण, सामाजिक न्याय आणि मानवी सन्मान यांचे संरक्षण व्हावे. शहर उंच व्हावं, पण माणसाचं मनही उंच राहिलं पाहिजे. शहरांनी समता आणि मानवतेचा स्पर्श न हरवता संधी दिल्या पाहिजेत.

शेवटी, शहर हे केवळ भौगोलिक जागा नसून 'मानवी जीवनाचा स्पंदनबिंदू' आहे. शहरांनी जर माणसाला सहकार्य, संवेदना, विश्वास आणि परस्परसंबंध यांसह जगायला शिकवले तरच शहरीकरण खऱ्या अर्थाने मानव सभ्यतेच्या विकासाचा दीपस्तंभ बनेल. अन्यथा, शहरीकरण प्रगतीच्या नावाखाली मानवी आत्म्याला निर्जीव करणारा प्रवास ठरू शकतो. म्हणूनच आजच्या या जागतिक शहरीकरण दिवसाच्या निमित्ताने आपण आपल्या शहरांकडे फक्त 'रचना' म्हणून नव्हे, तर 'जीवनशैली, संस्कृती आणि मानवी संबंधांचे घर' म्हणून पाहण्याची संवेदनशीलता जपली पाहिजे.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(समाजशास्त्राचे अभ्यासक)
मो. ९९६०१०३५८२,
bagate.rajendra5@gmail.com

## प्रबोधन

# अल्प हे आयुष्य । लावा सत्कारणी

महाभारताचं युद्ध संपलं. युद्धात श्रीकृष्णाच्या पक्षाने मोठा विजय संपादित केला. पांडवांच्या पक्षात आनंदीआनंद झाला. कुंतीमाता राजसूय यज्ञात महामहीम माता म्हणून धन्य धन्य झाली. सुखाच्या सागरात आकंठ बुडाली. अशा वेळी श्रीकृष्ण आपल्या आत्यांना विचारत होता, 'तुला आणखी काय हवं?' तेव्हा ती म्हणाली होती, 'कृष्णदेवा, मला दुःख दे!' सारे कुंतीचं मागणं ऐकून अचंबित झाले. कृष्णही मुद्दामच म्हणाला, 'सारे सुख मागतात, मग तू दुःख का मागतेस ?' तेव्हा कुंती म्हणाली, 'दुःख एवढ्यासाठी हवं की, त्यामुळे मला तुझी आठवण होईल.' श्रीकृष्णाने तथास्तु म्हटलं.

ह्या गोष्टीचा उपयोग टगे धर्मगुरू, लबाड पुराणिक, थापेबाज कीर्तनकार लोकांना भक्तिमार्गात फसवण्या– साठी करतात. अर्धवट विचारवंतांनी अर्धवट सुखवस्तू लोकांना ही गोष्ट सांगून वाहवाह मिळवली आहे. खरं तर, कुंती दुःख मागत नव्हती, तर ती आणखी सुखी होण्यासाठी श्रीकृष्णाचं सानिध्य मागत होती. आपलं सुख नष्ट होणार नाही, याची खात्री असलेली माणसंच रुचिपालट म्हणून स्वतःचं कौतुक करण्यासाठी म्हणून दुःख मागत असतात. आपण सुखी आहोत हे दाखवण्याचा हा मानभावीपणाही असेल. कुंतीच्या दुःख मागण्यात असाच काही प्रकार असावा.

अशा गोष्टीतून श्रीकृष्णार्पणमस्तु, सर्वसंगपरित्याग, श्रीगंगार्पणमस्तु, सर्वस्व अर्पण, प्रपंचावर तुलसीपत्र ठेवणे अशा थोतांडी कल्पनांनी जन्म घेऊन देशवासियांचं वाटोळं केलं आणि देशाला, देशाच्या कल्याणाला देशोधडीला लावलं. कुंतीचं उदाहरण समोर ठेवून दुःखाची अपेक्षा करणंही चुकीचं आहे आणि आहे ते सांभाळून त्यात भर घालून वाढवायचं सोडून, आहे ते सारंच कृष्णार्पण करून दुःखाच्या खाईत उडी मारणं, हे आणखी चुकीचंच आहे. कृष्णार्पणाची भावना पारमार्थिक, धार्मिक, आध्यात्मिक असणं हे समाजावरील फार मोठं संकट आहे. त्यातून अशा वाट चुकलेल्या (की चुकवलेल्या?) बुद्धीचा आणि कृतीचा गैरफायदा, पोथ्या लिहिणाऱ्या भट– ब्राह्मणांनी हजारो वर्षांपासून घेतला आहे. मुस्लीम, युरोपियन यांनी समाजाला केव्हा तरी लुटलं, पण संक्रातीला तिळगूळ, नवं वस्त्र, दक्षिणा भट–ब्राह्मणाला द्यावी; ग्रहण सुटलं, की ब्राह्मणाला दान द्यावं, मृताच्या शांतीसाठी ब्राह्मणाला गाय द्यावी, अशी लूट हजारो वर्षांपासून संस्कृतीच्या नावाखाली अहोरात्र चालू आहे. ही लुटारू संस्कृती कर्णाला दानशूर, छत्रपती संभाजींना धर्मवीर अशा पदव्या देऊन सर्वसामान्यांना स्वतःची वाट लागण्याइतक्या टोकाला जाण्यास प्रवृत्त करते. कुंतीचं टोकाला जाणं काय आणि कर्णाचं टोकाला जाणं काय, दोन्ही चुकाच आहेत. ते आदर्श नव्हेत.

आदर्श कसे असावेत? पंडित नेहरूंचं जीवन आदर्शवत होतं. नेहरूंनी त्याग केला पण त्यांच्या कोटावरचा लाल गुलाब कधी कोमेजला नाही. ते गांधीजींचे शिष्य होते, पण ते अगदीच विनोबा झाले नाहीत. या वर्षी बिल गेट्सने जगाचं आरोग्य सांभाळण्यासाठी एड्ससारख्या जीवघेण्या विकारांवरील संशोधनांसाठी अब्जावधी डॉलर्स समाजाला दिले. वॉरेन बफेट यांनी आपली ८५ टक्के रक्कम बिल गेट्स फाऊंडेशनला दिली आणि जॅकी चॅनने अर्धी संपत्ती समाजाच्या हवाली केली. हे लोक भारतीय नाहीत म्हणून बरं! नाही तर रोगनिवारणाऐवजी त्यांनी सहस्त्र यज्ञ करून, संगमरवरी मंदिरं बांधून, तिरुपतीच्या बालाजीला कोहिनूरसारखा हिरा जडवलेला मुकूट किंवा सोन्याचा रथ वगैरे अर्पण करून आपल्या दानशूरपणाला धार्मिकतेचं विकृत वळण नक्की लावलं असतं.

आपल्या देशातील नेते, अभिनेते, क्रीडापटू बिनडोकपणे धार्मिकतेवर खर्च करून धन्य होताहेत. जगाने त्यांच्या चातुर्यावर, अभिनयावर, क्रीडापटुत्वावर स्तुतीसुमनं उधळून उपयोग नाही. कारण ही माणसं विवेकी नाहीत, हे त्यांच्या कमकुवत बुद्धीने सिद्धच केलं आहे. जी माणसं स्वतः सुख भोगतात आणि समाजालाही सुखं वाटतात. त्यांचं व्यक्तिमत्त्व परिपूर्ण आणि आदर्श असतं. यासाठी–

सुख मिळवावे । सुख सर्वा द्यावे
विरक्त न व्हावे । कोणी सुद्धा ॥ १
करा उपकार। उदारही व्हावे
परि न त्यागावे । निज सौख्या ॥ २
स्वार्थ साधूनिया । परार्था साधावे
विवेके वागावे। जीवनात ॥ ३
साऱ्यांनाच दुःखी । करतो विरक्त
त्याहून आसक्त । बरा वाटे ॥४
अल्प हे आयुष्य । लावा सत्कारणी
जीवनाची गाणी । गाऊन घ्या ॥५
विरक्त त्यागतो। स्वतःसह जगा
दुर्दैवाच्या भोगा । निमंत्रितो ॥ ६
स्वार्थ– स्वार्थत्याग। नसावे टोकाचे
मर्म आयुष्याचे। समाधान ॥ ७



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर–416012
92258 09071

# कारवाईमुळे शहरातील रस्ते मोकळे होऊन वाहतूक व्यवस्था सुधारेल – आयुक्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे व पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या आदेशानुसार, शहरात रस्त्याच्याकडेला महिनोमहिने उभी असलेली बेवारस, गंजलेली आणि वाहतुकीस अडथळा ठरणारी, अस्वच्छता निर्माण करणारी वाहने व इतर साहित्य हटविण्याची मोहीम महानगरपालिका आणि वाहतूक पोलीस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हाती घेण्यात आली आहे. शहरातील रस्त्यांच्याकडेला आणि मोकळ्या जागांमध्ये उभी असलेली वाहने यासंदर्भात महानगरपालिकेच्या आरोग्य निरीक्षकांमार्फत सर्वेक्षण करण्यात आले असून त्यानुसार खालीलप्रमाणे आकडेवारी नोंदविण्यात आली आहे.




चारचाकी वाहने : 102, दुचाकी वाहने : 37, तीनचाकी वाहने : 39, ट्रक : 5, डंपर : 1, इतर साहित्य : 303, एकूण: 487. या सर्व वाहनमालकांना व साहित्य धारकांना नोटीस बजावण्यात आली आहे. यासंदर्भात या आधीच वर्तमानपत्रात जाहीर प्रसिद्धीकरण देण्यात आले आहे. अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्या नियंत्रणाखाली या कारवाईची सुरुवात करण्यात आली.

पहिल्या टप्प्यात रेल्वे स्टेशन रोडवरील 'लावण्या रंग ट्रॅव्हल्स' ही बेवारस बस उचलण्यात आली असून, हे वाहन वाहतूक पोलीस विभागाच्या ताब्यात देण्यात आले आहे. या कारवाईमुळे शहरातील रस्ते मोकळे होऊन वाहतूक व्यवस्था सुधारेल. तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेत वाढ होईल. रस्ते मोकळे झाल्याने तेथील स्वच्छता करणे सुलभ होणार आहे. एकंदरच शहरवासीय तसेच शहरांमध्ये येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांमध्ये शहर स्वच्छ, सुंदर असल्याबाबत भावना निर्माण होणार आहे. या कारवाईमुळे अशा शासकीय जागेवर बेवारस अवस्थेत लावलेल्या वाहनांच्या खाजगी मालकांमध्ये जागृतीसह एक प्रकारची धास्ती निर्माण झालेली आहे.

# मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक विजय कुमार सोलापूर दौऱ्यावर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक विजय कुमार यांनी गुरुवारी (दि. ६) सोलापूर विभागातील टिकेरवाडी येथे सुरू असलेल्या नव्या कोच टर्मिनल प्रकल्पाची पाहणी करून कामांना वेग देण्याचे निर्देश दिले.




वाडी ते सोलापूर या संपूर्ण सेक्शनचा आढावा घेताना त्यांनी पायाभूत सुविधा आणि प्रवासी सेवांच्या सुधारणांबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली.

दौऱ्याची सुरुवात सकाळी साडेनऊ वाजता वाडी स्टेशनपासून झाली. महाव्यवस्थापकांनी सर्वप्रथम वाडी आणि हिरेनंदूर स्टेशनवरील साईडिंग व एस्ट्रा लाईन टाकण्याच्या कामांची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी गुलबर्गा स्टेशनवर थांबून वाहतूक व्यवस्थापन, रेल्वे सुविधांमधील सुधारणा आणि स्टेशन परिसरातील कामांचा आढावा घेतला.

यानंतर त्यांनी टिकेरवाडी येथे प्रस्तावित कोच टर्मिनलचे स्थळ प्रत्यक्ष पाहिले. या टर्मिनलमुळे सोलापूर विभागात गाड्यांच्या तांत्रिक देखभालीची क्षमता वाढणार असून, स्थानिक स्तरावर नवीन गाड्यांच्या प्रारंभाला आणि प्रवासी सुविधांच्या विस्ताराला मोठी चालना मिळेल. महाव्यवस्थापकांनी संबंधित अधिकाऱ्यांना कामांच्या गतीत वाढ करून प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

तसेच त्यांनी प्रकल्पातील सुरक्षा, पायाभूत सुविधा आणि कामाच्या गुणवतेवर विशेष लक्ष ठेवण्याचे आदेश दिले. सायंकाळी पाच वाजता विजय कुमार सोलापूर रेल्वे स्थानकावर दाखल झाले. त्यांनी स्थानक परिसर, प्लॅटफॉर्म, प्रवासी सुविधा आणि सुरू असलेल्या नूतनीकरण कामांची पाहणी केली. स्वच्छता, डिस्प्ले सिस्टम आणि प्रवासी प्रवाह व्यवस्थापनात अधिक सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या.

या दौऱ्यात सोलापूर विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजीत मिश्रा, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील तसेच इतर वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# पुणे पोलीस दलातील विठ्ठल कारंडे ठरले पहिले 'आयर्न मॅन'

**पुणे (कटूसत्य वृत):–** सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील निंबोडी गावचा सुपुत्र आणि पुणे शहर पोलीस दलातील शिपाई विठ्ठल कारंडे यांनी मलेशियातील लांगकावी बेटावर पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या 'आयर्न मॅन' स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत भारताचा झेंडा उंचावला आहे.

दिनांक १ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या या स्पर्धेत सहभागी झालेल्या १०० हून अधिक भारतीय स्पर्धकांमध्ये विठ्ठल कारंडे यांनी चौथा क्रमांक पटकावला असून, पुणे शहर पोलीस दलातील पहिले 'आयर्न मॅन' होण्याचा मान मिळवला आहे.

या अत्यंत कठीण आणि मानवी शरीराचा कस लावणाऱ्या स्पर्धेत ४ कि.मी. समुद्रात पोहणे, १८० कि.मी. सायकलिंग आणि ४२.२ कि.मी. धावणे — हे तिन्ही टप्पे केवळ १७ तासांत पूर्ण करायचे असतात. परंतु




'लहरों से डरकर नौका पार नहीं होती, कोशिश करने वालों की कभी हार नहीं होती. 'मानवतेच्या शक्तीला आणि जिद्दीला सलाम' आयर्न मॅन'ऑफ पुणे पोलिस

– विठ्ठल कारंडे

कारंडे यांनी ही संपूर्ण स्पर्धा फक्त १२ तास ६ मिनिटे ५६ सेकंदांत पूर्ण करून भारताचा मान वाढवला.

शेतकरी कुटुंबातील कारंडे यांनी आपले प्राथमिक शिक्षण निंबोडी गावात, तर बी.ए.पर्यंतचे शिक्षण लोणंद येथे घेतले. २०१२ साली पुणे शहर पोलीस दलात भरती झाल्यानंतर नोकरी, कुटुंब आणि शारीरिक प्रशिक्षण यांचा सुंदर समतोल राखत त्यांनी हा पराक्रम साध्य केला. पहाटे उठून सराव, ड्युटी आणि दिवसातील थोड्याशा विश्रांतीच्या वेळातही सराव सुरू ठेवण्याची त्यांची चिकाटी व जिद्द प्रेरणादायी ठरली आहे.

कारंडे यांना त्यांच्या पत्नी सौ. सुजाता कारंडे यांचा खंबीर पाठिंबा मिळाला. तसेच त्यांचे प्रशिक्षक डॉ. योगेश सातव यांनी 'तुम्ही निश्चित वेळेत स्पर्धा पूर्ण कराल' असा विश्वास निर्माण करून शास्त्रशुद्ध प्रशिक्षण दिले, असे कारंडे यांनी सांगितले.

त्यांच्या या यशामुळे संपूर्ण निंबोडी गाव, सातारा जिल्हा, तसेच पुणे पोलीस दल अभिमानाने भरून गेले आहे. अधिकारी वर्ग, सहकारी पोलीस बांधव आणि नागरिक त्यांच्या या यशाचा मनस्वी अभिमान बाळगत आहेत.

## वात्रटिका

### चोरी खोटी का खरी

खोटी तरी कशी म्हणावी
आणि कशी म्हणावी खरी...
पुराव्याचा ढिग लावला
आणि दाखवली मत चोरी...
ईव्हीएमचे ओझे कमी झाले
आता सोबत आला दुबार...
संशयात सापडला आयोग
आणि ढिसाळ कारभार...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# महिला बचत गटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध : पालकमंत्री गोरे

**सोलापूर (कटूसत्य वृत):-** ग्राम विकास विभाग, जिल्हा परिषद सोलापूर यांच्या उमेद उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील महिला बचत गटांच्या वस्तूंना हक्काची बाजारपेठ जिल्हास्तरावर उपलब्ध व्हावी यासाठी रुक्मिणी मिनी शॉपिंग मॉल व उपहारगृह चे उद्घाटन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत आमदार सुभाष देशमुख हस्ते फित कापून करण्यात आले.



या उद्घाटन कार्यक्रमास आमदार सुभाष देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, सूर्यकांत भुजबळ, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, लेखाधिकारी शुभांगी देशपांडे, जिल्हा व्यवस्थापक राहुल जाधव, संतोष डोंबे सह सर्व तालुका व्यवस्थापक आदी उपस्थित होते.

पालकमंत्री गोरे म्हणाले की, जिल्ह्यातील महिला बचत गटांच्या उत्पादित खाद्यपदार्थांचे याठिकाणी रुक्मिणी शॉपिंग मॉलमध्ये विक्री होणार असून शासनाच्या या उपक्रमामुळे महिला बचत गटाच्या उत्पादित वस्तूंना एक बाजारपेठ मिळाली आहे. यामुळे ग्रामीण भागातील महिला तसेच शहरी भागातील महिलांची आर्थिक उन्नती होणार होईल. तसेच सदर उपक्रमामुळे सोलापूर जिल्ह्यातील बचत गटांनी उत्पादित केलेल्या उत्पादनाला मार्केटिंग, पॅकेजिंग डिस्ट्रीब्यूशन याबाबत प्रशिक्षण मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

उमेदच्या माध्यमातून महिला सक्षमीकरासाठी सरकारच्या वतीने पुढाकार घेतला जाणार आहे. उमेद रुक्मिणी मिनी शॉपिंग मॉल व उपहारगृह उपक्रम कौतुकास्पद आहे. उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून उभा केलेला रूक्मिणी मिनी शॉपिंग मॉल व उपहारगृह हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

सोलापुर शहरातील पार्क चौक येथे रुक्मिणी मॉल व उपहारगृह येथे सोलापूर जिल्ह्यातील पॅकेजिंग, लेबलिंग उत्तम असलेल्या 100 नाविन्यपूर्ण उत्पादने विक्री करिता ठेवण्यात आली आहेत.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी रूक्मिणी शॉपिंग मॉल व उपहारगृहाची संकल्पना सांगून उमेद मार्फत जिल्ह्यात राबविलेल्या उपक्रमाची माहिती दिली. हा मॉल शुभदा महिला बचत गटाच्या सदस्यांना चालवण्यात देण्यात आलेला आहे.

# जाज्वल इतिहासाच्या प्रेरणेतूनच समृद्ध भारताची निर्मिती शक्य - पाटील

**सोलापूर, (कटूसत्य वृत):-** स्वातंत्र्योत्तर आणि स्वातंत्र्यपूर्व काळातील घटनांचा आढावा घेता त्यामधील प्रेरणास्थाने शोधून त्यातून बोध घेतल्यामुळेच आपल्याला समृद्ध भारताची उभारणी करणे आणि नव्या दमाने विकास घडविणे शक्य झाले आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी केले. ते शासनाच्या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग तथा सांस्कृतिक कार्य मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वंदे मातरम गीताच्या सार्थ शताब्दी महोत्सवाचे अध्यक्ष म्हणून बोलत होते.



येथील महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व राणी कित्तूर चेन्नम्मा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) या दोन्ही संस्थांच्या संयुक्त विद्यमाने सदरच्या कार्यक्रमाचे सोलापूर येथे आयोजन करण्यात आलेले होते.

यावेळी प्रांताधिकारी सदाशिव पडदुणे, NCC चे कमांडिंग ऑफिसर रणधिर सतिश, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार, कोषागार अधिकारी वैभव राऊत, एस,आर,पी,एफ सहाय्यक समादेश श्री.आऊंदेकर, सहायक पोलिस आयुक्त मच्छिंद्र पंडीत, तरूण भारतचे माजी संपादक अरविंद जोशी, प्रसाद जिरांकलगीकर,आय,टी,आय चे प्राचार्य मनोज बिडकर आदी कर्मचारी अधिकारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वंदे मातरम गीताला 150 वर्षे पूर्ण झाल्याचे निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी 358 तालुक्यातून या कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले. सोलापूर येथील कार्यक्रम होम मैदान येथे आयोजित करण्यात आलेला होता. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील हे होते. प्रसाद जिरांकलगीकर यांनी पाच कडव्यांचे संपूर्ण वंदे मातरम गीत सादर केले व त्यांच्या सुरात सूर मिसळून उपस्थित सुमारे साडेसहा हजार जणांनी हे गीत गाऊन वातावरण राष्ट्रभक्तीमय केले. प्राचार्य तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी मनोज बिडकर यांनी प्रस्ताविक केले याप्रसंगी सोलापूर शहर व परिसरातील विविध 45 शाळा महाविद्यालय येथील प्रशिक्षणार्थी, विद्यार्थी , विद्यार्थिनी यासोबतच शासकीय तथा निमशासकीय कार्यालय येथील कर्मचारी अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरातील विविध शाळा तथा महाविद्यालयातील एनसीसी युनिट्स व एनएसएस युनिट्स चा या कार्यक्रमामध्ये सक्रिय सहभाग होता.

जुळे सोलापूर परिसरातील वि.मो. मेहता प्रशालेतील विद्यार्थ्यांनी वंदे मातरम या विषयावर आकर्षक पथनाट्याचे सादरीकरण केले. याप्रसंगी विविध शाळा आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षणार्थींनी विविध राज्यांच्या पारंपारिक वेशभूषे सह उपस्थिती नोंदवून या सोहळ्यात रंगत आणली.

सोलापूर शहरातील हरीभाई देवकरण प्रशाला सिद्धेश्वर प्रशाला रॉजर्स इंग्लिश मीडियम स्कूल लिटिल फ्लॉवर कॉन्व्हेंट स्कूल ज्ञान प्रबोधिनी प्रशाला सेवासदन प्रशाला वि मो मेहता प्रशाला हिराचंद नेमचंद प्रशाला विविध खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था यामधून शेकडो विद्यार्थी तसेच एस आर पी कॅम्प सोलापूर पोलीस ग्रामीण पोलीस पोलीस अधीक्षक कार्यालय यासारख्या विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी तथा कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्याच्या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाने सोलापूर येथे दि. 07 नोव्हेंबर 2025 रोजी सकाळी साडेनऊ ते साडेदहा या वेळेत सामूहिक वंदे मातरम गायन उपक्रम आयोजित केला. या कार्यक्रमात सोलापूरच्या जवळपास 45 माध्यमिक शाळा व महाविद्यालये यांचे विद्यार्थी व शिक्षक, स्वयंसेवी संघटनांचे प्रतिनिधी, सेवानिवृत्त कर्मचारी, जिल्हा परिषद, महानगरपालिका, पोलीस आयुक्तालय, ग्रामीण पोलीस, जिल्हा कोषागार येथील प्रशासकीय अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयटीआयचे केंदळे प्रवीण व श्रीमती कुंभार यांनी केले. प्रास्ताविक संस्थेचे प्राचार्य मनोज बिडकर यांनी केले, तर सूर्यकांत झणझणे यांनी आभार मानले.

# पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते विकास कामांचे भूमिपूजन



**सोलापूर, (कटूसत्य वृत):-** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत हत्तुर गाव, तालुका दक्षिण सोलापूर येथे ग्रामदैवत श्री सोमेश्वर व बनसिद्धेश्वर मंदिराच्या विकास आराखड्याच्या कामाचे भूमिपूजन राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते संपन्न झाले.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तुर गावात ब वर्ग देवस्थान श्री सोमेश्वर व बनसिद्धेश्वर या ग्रामदैवताच्या विकासासाठी 3 कोटी 75 लाख रुपये निधीच्या विकास कामाचे भूमिपूजन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच गावातील इतर विकास कामांसाठी 60 लाख रुपये निधीची कामाचे भूमिपुजन करण्यात आले, ज्यामुळे एकूण 4 कोटी 35 लाख रुपये निधीच्या कामांचे भूमिपूजन झाले. यावेळी आमदार सुभाष देशमुख, प्रांत अधिकारी सुमित शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत सूर्यकांत भुजबळ, सहाय्यक गटविकास अधिकारी बाळासाहेब पाटील, सरपंच सौ. ज्योतीताई कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी यावेळी बोलताना प्रत्येक गावातील जनता आपल्या ग्रामदैवतावर श्रद्धा ठेवते यावर भाष्य केले. त्यांनी हत्तूर गावाच्या पुल व रस्त्यासाठी 1 कोटी 90 लाख रुपयांचा निधी मंजूर केला असल्याची माहिती दिली.

तसेच, अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीबद्दल तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांना दिले. यावेळी त्यांनी माननीय मुख्यमंत्री यांचे आभार मानले की त्यांनी शेतकऱ्यांसाठी 31,500 कोटी रुपये निधी दिला आणि पावसामुळे व पुरामुळे खरडून गेलेल्या शेत जमिनीला 47,000 रुपये हेक्टरी मदतीचा निर्णय घेतला. आमदार सुभाष देशमुख यांनी ग्रामदैवत श्री सोमेश्वर व बनसिद्धेश्वर यांच्या विकासाबरोबरच गावातील इतर विकास कामांबद्दल बोलताना पालकमंत्री यांचे आभार मानले. त्यांनी गावचा शैक्षणिक व आर्थिक स्तर वाढवण्यासाठी विशेष लक्ष तसेच पर्यटनाच्या दृष्टीने ही गावाचा सर्वांगीण विकास साठी व कुडलसंगम या तिर्थ क्षेत्राच्या कामाला देण्याबाबत प्रयत्न करण्याची मागणी त्यांनी केली. कार्यक्रमाच्या शेवटी वंदे मातरम या गीताला 150 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सामूहिक वंदे मातरम गीताचे गायन करण्यात आले.

# राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून निवडणूक समिती जाहीर

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून जोरदार तयारी केली जात असून या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवरच पक्षाकडून जिल्हा निवडणूक समिती जाहीर करण्यात आली आहे.माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील,खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्यासह अनेक दिग्गज नेते मंडळींचा या निवड समितीत समावेश असून या नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण ताकदीने निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचे जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख व कार्याध्यक्ष रविंद्र पाटील यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने सरचिटणीस रवींद्र पवार यांनी जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख यांना नुकतेच या जिल्हा निवडणूक समितीचे पत्र पाठवले असून यामध्ये राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, जिल्हाध्यक्ष वसंत नाना देशमुख, कार्याध्यक्ष रवींद्र पाटील, आ.अभिजीत पाटील, आ.उत्तमराव जानकर, आ. राजू खरे, आ.नारायण आबा पाटील,माजी आ. लक्ष्मण ढोबळे, माजी आमदार रमेश कदम, शेखर माने,अनिल सावंत, विश्वासराव बारबोले, बाबुराव गायकवाड,सूरज देशमुख,विनंती कुलकर्णी, सुवणार्ताई शिवपुरे, धनंजय साठे,अरुण तोडकर, बाळासाहेब खान यांची जिल्हा निवडणूक समिती म्हणून निवड करण्यात आली आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगर पालिका, नगरपरिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी या समितीची नियुक्ती करण्यात आली आहे असे यावेळी जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख व कार्याध्यक्ष रवींद्र पाटील यांनी सांगितले.

# वंदे मातरम हे प्रत्येक भारतीयाला प्रेरणा देणारे गीत - पालकमंत्री गोरे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वंदे मातरम हे गीत भारतातील प्रत्येक नागरिकाला प्रेरणा देणारे गीत आहे. देश प्रेमाची धगधगती ऊर्जा 150 वर्षांनंतरही या गीतातून आजही मिळते. 1875 साली बंकिमचंद्र चटर्जी यांनी लिहिलेले वंदे मातरम हे गीत स्वातंत्र्ययुद्धाचे राष्ट्रगान बनले व प्रत्येक भारतीयाच्या मनात राष्ट्रभक्तीचे स्फुल्लिंग चेतविले, असे प्रतिपादन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर भारताचा 150 बाय 100 फुटांचा मानवी नकाशा साकारण्यात आला. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या शुभहस्ते कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले.

याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी श्रीमती रोहिणी तडवळकर, छत्रपती शिवाजी महाराज शासकीय सर्वोपचार रुग्णालयाच्या डॉ. अग्रजा चिटणीस वरेरकर, आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष मोहन डांगरे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या राज्यपाल नियुक्त अधिसभा सदस्य ॲड. सुनंदा भगत, सामाजिक कार्यकर्त्या मनीषा चारी- वालेकर, दयानंद शिक्षण संस्थेचे प्रशासक प्रा. डॉ. व्ही. पी. उबाळे, डी. बी. एफ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य बी. एच. दामजी आदी उपस्थित होते.

पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मन की बात कार्यक्रमातून वंदे मातरम या गीताच्या वैभवशाली वारशाची आठवण देशाला करून दिली. 2047 साली भारतीयांच्या स्वप्नातील विकसित भारताच्या जडणघडणीत वंदे मातरम हे गीत महत्त्वाचे ठरणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

वंदे मातरम या राष्ट्रीय गीताला 150 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आई प्रतिष्ठान आणि दयानंद शिक्षण संस्थेतर्फे शुक्रवारी दोन हजार विद्यार्थिनींनी सामूहिक वंदे मातरम गायन केले. यावेळी दोन हजार विद्यार्थिनींनी दीड एकर जागेत भारताचा मानवी नकाशा साकारला.

राष्ट्रभक्तीचे स्फुल्लिंग चेतविणाऱ्या या कार्यक्रमास पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी उपस्थित राहून 'वंदे मातरम' चे गायन करीत विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. कलाकार विपुल मिरजकर यांनी दोरीच्या साह्याने भारताचा मानवी नकाशा साकारला.

या उपक्रमात दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, डी. ए. व्ही. वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, डी. जी. बी. दयानंद विधी महाविद्यालय, डी.पी.बी. दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, दयानंद काशिनाथ असावा प्रशाला, भू. म. पुल्ली कन्या प्रशाला, मार्कंडेय हायस्कूल, सिद्धेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील दोन हजार विद्यार्थिनी उत्साहात सहभागी झाल्या होत्या.

# हिरकणी सखी मंच्याकडून दीपोत्सव साजरा

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ यांची सहयोगी संस्था असलेल्या हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने हिरकणी सखी मंच्याकडून त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त न्यासाच्या प्रांगणात व श्री तुळजाभवानी माता मंदिर या ठिकाणी भव्य दीपोत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. लख..! लख..!! दिव्यांनी न्यासाचा परिसर उजळून निघाला होता.



सदरचा कार्यक्रम संस्थेचे आधारस्तंभ व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले व अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाला. कार्तिक पौर्णिमेला धार्मिकतेत महत्व असून, यानिमित्त सालाबादाप्रमाणे न्यासाकडून यंदा हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने हिरकणी सखी मंच्याकडून दीपोत्सव या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्रिपूर पौर्णिमेनिमित्त त्रिपूर वाती लावण्याची परंपरा असून, यादिवशी शंकराने तीन असुरांचा वध केला, अशीही आख्यायिका आहे. त्यामुळे यादिवशी त्रिपूर वात लावली जाते. म्हणून हिरकणी सखी मंच्याकडून दीपोत्सव कार्यक्रम आयोजित करण्यात आला होते. याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा अलकाताई जनमेजयराजे भोसले, उपाध्यक्षा रत्नमाला मचाले, सचिवा अर्पिताराजे अमोलराजे भोसले, विश्वस्त व माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, खजिनदार स्मिता कदम, निकम, पल्लवी कदम, संगीता भोसले, सपना माने, सुवर्णा घाटगे, रूपा पवार, अनिता गडदे, सीमा जाधव, कोमल क्षीरसागर, शीतल क्षीरसागर, तृप्ती बाबर, अन्नपूर्णा कलबुर्गी, कविता भोसले, कविता वाकडे यांच्यासह महिला वर्ग, सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते. दरम्यान न्यासाच्या यात्री निवास येथे रांगोळी साकारून लक्षदिपोत्सव करण्यात आला.

# एनटीपीसी स्थापना दिवस व सुवर्ण महोत्सवाचा भव्य उत्सव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एनटीपीसी सोलापूर प्रकल्पात एनटीपीसीचा ५१ वा स्थापना दिवस आणि सुवर्ण महोत्सव अत्यंत उत्साहाने आणि आनंदात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात वृक्षारोपणाने झाली, त्यानंतर प्रकल्पप्रमुखांनी एनटीपीसीचा ध्वज फडकावून संस्थेच्या गौरवशाली ५० वर्षांच्या प्रवासाचा स्मरण केला.



या प्रसंगी बी. जे. सी. शास्त्री, कार्यकारी संचालक (एनटीपीसी सोलापूर) यांनी सर्व कर्मचाऱ्यांना संबोधित करताना संस्थेच्या सुवर्ण प्रवासाचा आढावा घेतला आणि सर्वांना सुरक्षा, गुणवत्ता व नवोन्मेष यांच्या बळावर सतत प्रगती करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमादरम्यान पॉवर एक्सेल आणि एम्प्लॉयी ऑफ द इयर पुरस्कार प्रदान करून कर्मचाऱ्यांच्या कठोर परिश्रम व उत्कृष्ट योगदानाचा गौरव करण्यात आला.

या प्रसंगी बी. जे. सी. शास्त्री, कार्यकारी संचालक (एनटीपीसी सोलापूर), एम. के. बेबी, मुख्य महाव्यवस्थापक (प्रचालन व अनुरक्षण), सुभाष एस. गोखले, महाव्यवस्थापक (अनुरक्षण व प्रशासन), तसेच सर्व विभागप्रमुख आणि कर्मचारी यांनी आपली मान्यवर उपस्थिती दर्शविली.

# ‘स्थानिक स्वराज्य निवडणुकांसाठी सज्ज व्हा-उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, आमदार शिवाजीराव गरजे, महिला आयोगाच्या अध्यक्षा तथा प्रदेश महिला अध्यक्ष रूपाली चाकणकर, अल्पसंख्यांक महाराष्ट्र अध्यक्ष नाझीर काझी, ओबीसी प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, यांच्या प्रमुख उपस्थितीत वरळी, मुंबई येथील रॉयल हॉल, एन.एस. सी.आय. (डोम) येथे राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा प्रभाव वाढवण्यासाठी रणनीती आखण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले की,



महायुती सरकारच्या माध्यमातून निवडणुका लढवण्याचा आमचा मानस आहे. मात्र,आवश्यक असल्यास स्वबळावरही लढण्यासाठी तयार राहा. त्यांनी सर्व कार्यकर्त्यांना पक्षाची विचारधारा सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे आणि प्रत्येक जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार मोठ्या संख्येने विजयी करण्याचे आवाहन केले.या बैठकीस सोलापूर शहर जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये माजी आमदार संजय मामा शिंदे, कल्याणराव काळे, सोलापूर शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, सोलापूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष उमेश पाटील, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, माजी नगरसेवक व प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, ज्येष्ठ नगरसेवक तौफिक पैलवान शेख, माजी नगरसेवक गणेश पुजारी,अल्पसंख्यांक अयोग्य सदस्य वसीम बुरान, प्रदेश सचिव शशिकांत बापू कांबळे, प्रदेश सचिव इरफान शेख, अविनाश भडकुंबे,माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, सेवादलचे चंद्रकांत दायमा, मोहोळकर, युवक अध्यक्ष सुहास कदम, महिला अध्यक्ष संगिता जोगदनकर, कार्याध्यक्ष चित्र कदम, प्रमोद भोसले, सलीम पामा, शफी इनामदार, अमीर शेख, आनंद गाडेकर, महादेव राठोड यांच्यासह पक्षाचे विविध सेलचे अध्यक्ष व पक्षातील प्रमुख पदाधिकारी यांचा समावेश होता. सोलापूर जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी आगामी निवडणुकीसाठी सज्ज असल्याचा निर्धार व्यक्त केला असून, पक्षाच्या धोरणांनुसार नागरिकांशी थेट संवाद साधून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भक्कम स्थान मिळवून देण्याचे ध्येय ठेवले आहे. दरम्यान स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतील पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचे आणि कार्यकर्त्यांचे बळ वाढवण्यासाठी आणि पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करावे असे मार्गदर्शन देखील यावेळी प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांनी या बैठकीदरम्यान उपस्थित पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना केले.


## अकलूज नगरपरिषद,अकलूज

ता, माळशिरस.जि.सोलापूर (महाराष्ट्र)

फोन - (०२१८५) २२०३५,२२५९२

Gmail-comcakluj21@gmail.com स्थापना दिनांक ०३-०८-२०२१

जा.क्रं./१६२६/अनप/२०२५ दिनांक :-०७/११/२०२५

**अकलूज नगरपरिषद, , अकलूज**
**निविदा सूचना सन २०२५-२०२६**

अकलूज नगरपरिषदेच्या वाहन विभागा मार्फत अंतर्गत खालील कामाकरिता तरी योग्य त्या कंत्राटदाराने आपले मोहर बंद निविदा दि.०८/११/२०२५ ते ११/११/२०२५ दु.५:०० वाजेपर्यंत मुख्याधिकारी, अकलूज नगरपरिषद यांचे कार्यालयाकडे सादर करावे. सदर कामाची कोरी निविदा दि. ०८/११/२०२५ ते ११/११/२०२५ पर्यंत अकलूज नगरपरिषद कार्यालयात निविदा फॉर्म मिळेल.

| अ.क्र. | कामाचे नाव | बयाना रक्कम | कामाचे वर्णन | निविदा फॉर्म किमंत |
|---|---|---|---|---|
| ०१ | अकलूज नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ कामी विविध प्रकारचे वाहन पुरवठा करणे. | ५०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- |

वरीलप्रमाणे कामा करिता इच्छुक कंत्राटदाराने आपली सिलबंद निविदा अकलूज नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत दि. ०८/११/२०२५ ते ११/११/२०२५ या कालावधी पर्यंत सादर करावी. तसेच मुदती नंतर आलेल्या व निविदा बयाना रक्कम न भरलेल्या धारकांचा विचार केला जाणार नाही. कोणतीही निविदा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार नगरपरिषेदेने राखुन ठेवला आहे.

सही/-
मुख्याधिकारी
अकलूज नगरपरिषद,अकलूज